स.ब.वि.प्र. समाजाचे,

**सहकार महर्षी भाऊसाहेब संतुजी थोरात कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय,**

संगमनेर, जि.अहमदनगर

# महाविद्यालयाने कोरोना विषाणु (कोव्हीड १९) चा प्रादुर्भाव रोखण्यासाठी केलेल्या प्रतिबंधात्मक उपाययोजना व राबविलेले उपक्रम





# Covid-19

Wash your Hands often





Use Masks

Maintain social distancing






Avoid going crowdy place

For more information search on WHO websites

S.M.B.S.T college sangamner
(Rida Maniyar ) NSS Volunteer

# मीच माझा रक्षक
# राष्ट्रीय सेवा योजना
## SMBST कॉलेज,संगमनेर

मार्गदर्शक- श्री.लक्ष्मणराव घायवट सर
संकलक- धिरजकुमार बाबासाहेब देशमुख

## -खबरदारीचे उपाय-



घराच्या बाहेर विनाकारण पडू नका.



तोंडाला मास्कचा वापर करा .



वेळोवेळी साबण किंवा सॅनेटायझरने हात स्वच्छ करा.



गर्दीत जाणे टाळा.



आजारी पडल्यास डॉक्टरांशी त्वरित संपर्क साधा.

(माहिती स्रोत- saTOPPERS)

# संगमनेरात कोरोना प्रतिबंधात्मक उपाय

**आश्वी : पुढारी वृत्तसेवा**

राज्यातील कोरोनाचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी सहकार महर्षी भाऊसाहेब थोरात सहकारी साखर कारखान्याने कामगारांची बायोमेट्रीक हजेरी स्थगित केल्याची माहिती कारखान्याचे अध्यक्ष बाबा ओहोळ यांनी दिली आहे. थोरात महाविद्यालयाने विद्यार्थी जागृतीसाठी व्याख्याने आणि अभियाने सुरू केल्याचे प्रा. दीनानाथ पाटील यांनी सांगितले.

महसूलमंत्री बाळासाहेब थोरात यांच्या मार्गदर्शनाखाली संगमनेर कारखाना हा तालुक्याचे हदय समजला जातो. नुकत्याच गाळप हंगामाची सांगता झाली असून कर्मचाऱ्यांना कोरोनाच्या पार्श्वभूमीवर सुट्टी देण्यात आली आहे. तसेच ज्या कर्मचाऱ्यांच्या रजा शिल्लक आहे, त्यांना या कोरोनाच्या काळात घेण्याच्या सूचना केल्या असून गर्दी टाळण्यासाठी सर्वोत्तोपरी खबरदारी घेतली जात आहे. कर्मचाऱ्यांची बायोमेट्रीक हजेरी बंद करुन फेस रिडर मशीन बसविण्यात आले आहे. कर्मचाऱ्यांसाठी विविध ठिकाणी सॅनेटायझरची सुविधा दिली आहे. कारखाना परिसरात स्वच्छतेसह फवारणी केली आहे.

कारखाना कार्यस्थळावरील दर गुरूवारी भरणारा आठवडा बाजारही स्थगित केला आहे. तसेच कारखाना कार्यालय, परिसरातही कोरोना जागृती बाबतचे फलक लावण्यात आले आहे. तरी नागरिक व सभासदांनी गर्दी टाळावी, काळजी घ्यावी असे आवाहन उपाध्यक्ष संतोष हासे, संचालक मंडळ व कार्यकारी संचालक जगन्नाथ घुगरकर यांनी केले आहे. दरम्यान, कोरोना विषाणूपासून महाविद्यालयीन विद्यार्थ्यांमध्ये जागृती करण्यासाठी थोरात महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना व महाविद्यालयाच्या वतीने अभियान राबविण्यात आले. के. बी. दादा सभागृहात ग्रामीण रुग्णालयाचे डॉ. घोलप, डॉ. कचेरिया यांचे व्याख्यान झाली. यावेळी प्राचार्य डॉ. दीनानाथ पाटील आदी उपस्थित होते.



**आश्वी : थोरात महाविद्यालयात कोरोनाबाबत मार्गदर्शन करताना व्याख्याते.**

केसरी १९।३।२०२० पा. ५

# थोरात कारखान्याकडून कर्मचाऱ्यांच्या हजेरीसाठी बायोमेट्रीकऐवजी फेसरिडरचा वापर


## आजचा आठवडे बाजारही स्थगित : ओहोळ

संगमनेर (वार्ताहर) : राज्यातील कोरोनाचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी सरकार उपाययोजना करत असून, सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात कारखान्याच्यावतीने हा प्रादुर्भाव रोखण्यासाठी कामगारांची बायोमेट्रीक हजेरीऐवजी फेसरिडर बसविले असून, कारखाना कार्यस्थळावरील आजचा (गुरुवार) आठवडे बाजारही स्थगित करण्यात आला असल्याची माहिती कारखान्याचे अध्यक्ष बाबा ओहोळ यांनी दिली.

कारखान्याच्या गाळप हंगामाची नुकतीच सांगता झाली. कर्मचाऱ्यांना कोरोनाच्या पार्श्वभूमीवर सुट्टी देण्यात आली आहे. या कर्मचाऱ्यांच्या रजा शिल्लक आहेत. त्या कोरोनाच्या काळात घेण्याच्या सूचना केल्या असून, गर्दी टाळण्यासाठी सर्वतोपरी खबरदारी घेतली जात आहे. तसेच कर्मचाऱ्यांची बायोमेट्रीक हजेरी बंद करून फेसरिडर मशीन बसविण्यात आले आहे. कर्मचाऱ्यांसाठी विविध ठिकाणी सॅनेटायझर्सची सुविधा उपलब्ध करून दिली असून, कारखाना परिसरात स्वच्छतेसह फवारणी केली जात आहे. कारखाना कार्यस्थळावरील दर गुरुवारी भरणारा आठवडे बाजारही स्थगित करण्यात आला आहे. तसेच कारखाना कार्यालय, परिसर याठिकाणी कोरोना जागृतीबाबतचे फलक लावण्यात आले आहेत. नागरिक व सभासदांनी गर्दी टाळून स्वतःची काळजी घ्यावी, असे आवाहन उपाध्यक्ष संतोष हासे व कार्यकारी संचालक जगन्नाथ घुगरकर यांनी केले आहे.

### अमृत उद्योगसमूहातही खबरदारी

अमृत उद्योगसमूहात अमृतवाहिनी शिक्षणसंस्था व सह्याद्री शिक्षणसंस्थेने विद्यार्थ्यांना कोरोनाच्या पार्श्वभूमीवर सुट्टी दिली असून, राजहंस दूध संघ, शेतकी संघ, अमृतवाहिनी बँक, शॅम्प्रो या ठिकाणी कर्मचाऱ्यांसाठी सॅनिटराझर्सची सुविधा उपलब्ध करू दिली असून, परिसरात औषधांची फवारणी केली आहे.



नायक पान ५

# सहकारमहर्षी थोरात महाविद्यालयात 'करोना' जागृती अभियान

## खबरदारी घेण्याबाबत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन; जनजागृतीचेही केले आवाहन

नायक वृत्तसेवा, संगमनेर

सध्या जगभरात थैमान घालत असलेल्या 'करोना' विषाणूपासून महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना दूर ठेवण्यासाठी व त्याबाबत जागृती निर्माण करण्यासाठी सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना व महाविद्यालयाच्यावतीने जागृती अभियान राबविण्यात आले असल्याची माहिती प्राचार्य डॉ.दीनानाथ पाटील यांनी दिली आहे.



महाविद्यालयाच्या के.बी. दादा सभागृहात झालेल्या जागृती अभियानांतार्गत करोना-कोव्हीड १९ विषाणू संदर्भात संगमनेर ग्रामीण रुग्णालयाचे वैद्यकीय अधिकारी डॉ.घोलप, डॉ.कचेरीया यांचे मार्गदर्शनपर व्याख्यान व कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. यावेळी व्यासपीठावर प्राचार्य डॉ. दीनानाथ पाटील, प्रा.लक्ष्मण घायवट आदी उपस्थित होते.

यावेळी डॉ.घोलप म्हणाले, विद्यार्थ्यांनी स्वच्छता बाळगावी, खोकताना व शिंकताना तोंडावर रुमाल धरावा, स्वच्छतागृहात जावून आल्यावर-जेवणापूर्वी-सार्वजनिक ठिकाणी गेल्यावर साबण किंवा स्वच्छता रक्षकने हात स्वच्छ धुवावे, समोरच्याशी बोलताना दोघांमध्ये १ मीटरचे अंतर ठेवून बोलावे अशा सूचना देत त्यांनी मार्गदर्शन केले. प्राचार्य डॉ.पाटील यांनी करोना विषाणूविषयी मार्गदर्शन करताना आत्तापर्यंतचा इतिहास, वेगवेगळ्या विषाणूने पसरविलेल्या विविध आजारांची माहिती देत 'खबरदारी ही उपचारापेक्षा किती श्रेष्ठ आहे' हे पटवून दिले.

महाविद्यालयात हात स्वच्छ करण्यासाठी पाण्याची व डेटॉल हॅण्डवॉशची व्यवस्था करण्यात आली आहे. करोना विषाणूविषयी जनजागृती व्हावी म्हणून फलक तयार करुन महाविद्यालयाच्या दर्शनी ठिकाणी लावण्यात आले आहे याशिवाय महाविद्यालया परिसर व मुलांचे वसतिगृ पूर्णपणे जंतूनाशक फवारा मार निर्जंतुक केले आहे.

दररोज स्वच्छता केली जा आहे. सूचना फलकावरही करो विषाणूविषयी खबरदारीचे फल लावले आहे. अनेक विद्यार्थ्यां आरोग्यदूत म्हणून काम करण्या उद्युक्त केले आहे.

प्रास्ताविक रा.से.यो कार्यक्रम अधिकारी प्रा.लक्ष्म घायवट यांनी केले. आभा प्रा.काशिद यांनी मानले. कार्यक्र यशस्वीतेसाठी प्रा.पी.एम गायकवाड, प्रा.संतोष खामकर प्रा.आबासाहेब पोकळे प्रा.नानासाहेब दिघे, प्रा.डेरे यांन विशेष सहकार्य केले.

पुणे आवृत्ती

बातम्यांचा राजा

जनप्रवास

मुंबई, पुणे, सांगली, कोल्हापूर, उस्मानाबाद, अ. नगर येथून एकाच वेळी प्रसिद्ध. RNI NO. MAHMAR/2013/57952

गुरुवार दि. १९ मार्च २०२० | वर्ष : ७ | अंक : १९९ | पाने ८

# सहकारमहर्षी भाऊसाहेब संतुजी थोरात महाविद्यालयात कोरोना जागृती अभियान

**संगमनेर | प्रतिनिधी**

सध्या जगभरात थैमान घालत असलेल्या कोरोना विषाणू पासून महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना दूर ठेवण्यासाठी व त्याबाबत जागृती निर्माण करण्यासाठी सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना व महाविद्यालयाच्या वतीने जागृती अभियाने राबविण्यात आले असल्याची माहिती प्राचार्य डॉ.दिनानाथ पाटील यांनी दिली आहे.

के.बी.दादा सभागृहात झालेल्या या जागृती अभियांतार्गत कोरोना –कोव्हीड १९ विषाणू संदर्भात संगमनेर ग्रामीण रुग्णालयाचे वैदयकीय अधिकारी डॉ. घोलप , डॉ. कचेरीया यांचे मार्गदर्शनपर व्याख्यान व कार्यशाळा आयोजित करण्यात आली. यावेळी व्यासपीठावर प्राचार्य डॉ.दीनानाथ पाटील, प्रा.लक्ष्मण घायवट आदि उपस्थित होते.



यावेळी डॉ.घोलप म्हणाले कि,विदयार्थ्यांनी स्वच्छता बाळगावी तसेच खोकताना व शिंकल्यावर, स्वच्छतागृहात जावून आल्यावर, जेवणापुर्वी, सार्वजनिक ठिकाणी गेल्यावर नेहमी साबण किंवा लिक्वीड सोप ने हात स्वच्छ धुवावे , समोरच्याशी बोलताना दोघांमध्ये १ मीटर चे अंतर ठेवून बोलावे अशा प्रकारच्या सुचना देवून मार्गदर्शन केले.

याप्रसंगी महाविदयालयाचे प्राचार्य डॉ दिनानाथ पाटील यांनीकार्यक्रमास आलेल्या मान्यवर डॉक्टरांचे स्वागत केले व कोरोना विषाणू विषयी मार्गदर्शन करताना आतापर्यंतचा इतिहासात वेगवेगळ्या विषाणूने पसरविलेल्या विविध आजारांची माहिती देवन खबरदारी ही उपचारापेक्षा किती श्रेष्ठ आहे हे पटवून दिले व त्यासाठी महाविदयालयातील सर्व विदयार्थ्यांना हात स्वच्छ करण्यासाठी पाण्याची व डेटॉल हॅण्डवॉशची व्यवस्था करण्यात आली. विदयार्थ्यांना कोरोना विषाणूविषयी जनजागृती व्हावी म्हणून महाविदयालयाने प्लेक्स बोर्ड तयार करुन महाविदयालयाच्या दर्शनी ठिकाणी लावला .


करोना विषाणू
काळजी करू नका, सावध रहा
हे करा....स्वतःला व इतरांना सुरक्षित ठेवा
आपले हात स्वच्छ धुवा
सहकारमहर्षी भाऊसाहेब संतुजी थोरात कला,विज्ञान व
वाणिज्य महाविद्यालय,संगमनेर, जि.अहमदनगर







